## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. रामाआ-नाशिक/द्वितीय अपील क्रमांक :- १५५९/२०२०/अहमदनगर**

१ श्री. किरण रामदास शिंदे, : अपिलार्थी
रा. राजराज नगर, औरंगाबाद नगर, औरंगाबाद रोड,
आसाम टी कंपनी शेजारी, शेंडी,
ता. जि. अहमदनगर-४१४६०१.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मोटार वाहन निरीक्षक,
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालय, अहमदनगर,
ता. जि. अहमदनगर.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालय, अहमदनगर,
ता. जि. अहमदनगर.

**सुनावणी दिनांक ०४/०५/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक ३१/०८/२०२० रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक ०४/०५/२०२२ रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी उपस्थित होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी (सेवानिवृत्त) उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"माहिती उपलब्ध करुन देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल".

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील संबंधित विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २७/०२/२०२० रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक २७/०२/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१/०८/२०१९ ते दिनांक २७/०२/२०२० या कालावधीतील कार्यालयामधील पासिंग करताना काढण्यात येणारे व्हिडीओ शुटिंग चे फुटेज व व्हिडीओ शुटिंग करणारे कोणत्या निकषावर नियुक्ती केली त्यांचे पत्र, नांव, पत्ता, हुद्दा व त्यांनी केलेल्या कामाची कार्यालयास नोंद घेणारी जबाबदार व्यक्ती व आदेश मिळण्याबाबत माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन सदर कालावधीत कोरोना कालावधी असल्याने शासनाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने केलेल्या लॉक डाऊनमुळे सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवरील मर्यादा व पोस्ट कार्यालय बंद असल्याने अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविता आली नाही. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०१/०६/२०२० अन्वये प्रथम अपील दाख़ल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१/०६/२०२० अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६/०७/२०२० रोजी निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांनी कोरोना कालावधी असल्यामुळे तसेच अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेख्यांवर उपलब्ध नसल्याने माहिती पुरविता

आली नसल्याचे सांगितल्याने तसेच अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वाहन योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करताना वाहनांचे चित्रीकरण जनहित याचिका क्र. २८/२०१३ च्या उच्च न्यायालयाच्या सुनावणीच्या अधिन राहुन केली जाते. अर्जानुसार कार्यालयाच्या कॅमेऱ्यात केली जाते. त्यामुळे ती माहिती देता येणार नाही, तसेच व्हिडीओ शुटींग संबंधीची इतर माहिती अभिलेख्यांवर उपलब्ध नाही, असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २७/०२/२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस सदर कालावधीत कोरोना कालावधी असल्याने अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नसल्याचे दिसुन येते. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयात माहिती उपलब्ध नाही, असे नमुद केले आहे, मात्र कोणत्या नियमानुसार माहिती उपलब्ध नाही, याबाबत काहीही नमुद केलेले नाही. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान नमुद केले की, नियमा प्रमणे १ वर्षाची माहिती जतन केली जाते. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती व्हिडीओ कॅमेऱ्यामध्ये उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत जाणुनबुजून काहीही शहानिशा केल्याचे दिसुन येत नाही. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ते शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झाले असल्याचे आयोगास सुचित केले. तसेच अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान त्यांना दिनांक ०१/०८/२०१९ ते दिनांक २७/०२/२०२० या कालावधीतील सप्टेंबर महिन्याची माहिती हवी असल्याचे आयोगास सुचित केले. तरी आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहमदनगर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७/०२/२०२० रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी

मागितलेल्या माहितीसंदर्भात दिनांक ०१/०८/२०१९ ते दिनांक २७/०२/२०२० या कालावधीतील सप्टेंबर महिन्याची माहिती व्यक्तीश: विनामूल्य पुरवावी.

२) प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालय, अहमदनगर, यांना सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द वरील परिपत्रकास अनुसरुन नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३) वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १५५९/२०२०/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

**प्रति,**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालय, अहमदनगर, ता. जि. अहमदनगर.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलट टपाली आयोगाला सादर करावी, तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

---

क्रमांक : रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र./१५५९/२०२०/अहमदनगर ओ- 9562        दिनांक 10/08/2022

---